सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान (एस.एम.एम.पी.पी.), संचलित गणपतराव आडके कॉलेज ऑफ नर्सिंग, सनफ्लॉवर कंपाऊंड, नाशिक-४२२ ००१

नवीन एम.एस्सी. (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक.एनयुआर १४२२/प्र.क्र.१६०/२२/शिक्षण-२

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१

दिनांक:-०४/०७/२०२३

संदर्भ:-१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी /पीजी/पी-५/१८१२/२०२२, दिनांक १५/११/२०२२.

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र.DMER-११०१५/१/२०२३ - CETIT, दिनांक २९/०१/२०२३

प्रस्तावना :- सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान (एस.एम.एम.पी.पी.), संचलित गणपतराव आडके कॉलेज ऑफ नर्सिंग, सनफ्लॉवर कंपाऊंड, नाशिक-४२२ ००१ या महाविद्यालयामध्ये M.Sc.(Psychiatric Nursing) हा नवीन एम.एस्सी. (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम १० विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरू करण्याचा प्रस्ताव वरील संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शिफारशीसह शासनास प्राप्त झाला होता. त्यानुसार सक्षमता तपासणी करुन संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याने, उक्त एम.एस्सी.(नर्सिंग) हा नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम १० विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह सुरू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान (एस.एम.एम.पी.पी.), संचलित गणपतराव आडके कॉलेज ऑफ नर्सिंग, सनफ्लॉवर कंपाऊंड, नाशिक-४२२ ००१ या संस्थेस सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून पुढील नमूद केलेला एम.एस्सी. (नर्सिंग) हा नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्यापुढे दर्शविलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरू करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

अभ्यासक्रम/विषय	विद्यार्थी प्रवेश क्षमता
M.Sc.(Psychiatric Nursing)	१०

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१. सदरहू संस्थेतील एम.एस्सी.(नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता १० विद्यार्थी इतकीच राहील.

२. राज्य शासन, केंद्रशासन, मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशांकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. केंद्र शासन, राज्य शासन तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी परिचर्या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूटस् (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे नव्याने सुरु करावयाच्या अभ्यासक्रमासाठी संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नयेत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

९. शासकीय परिचर्या किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

१०. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापुर्वी संस्था विहित मानकांची पुर्तता करीत आहे याची खात्री करावी.

११. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
१२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
१३. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१४. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
१५. सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
१६. प्राचार्य, सुखदेव महिपत मोरे-पाटील प्रतिष्ठान (एस.एम.एम.पी.पी.), संचलित गणपतराव आडके कॉलेज ऑफ नर्सिंग, सनफ्लॉवर कंपाऊंड, नाशिक-४२२ ००१
१७. निवडनस्ती (शिक्षण-२)

****